**दि म्युनिसिपल को-ऑपरेटिव्ह बँक लिमिटेड, मुंबई**

**मुंबई - ४०० ००१.**

**विषय : भारतीय रिझर्व्ह बँकेने पारित केलेल्या परिपत्रकानुसार कर्ज करारनाम्यात आवश्यक बाबी अंतर्भूत करणेबाबत**

भारतीय रिझर्व्ह बँकेमार्फत दिनांक ०२.०४.२०२४ रोजी पारित केलेल्या परिपत्रक क्रमांक RBI/2024-2025/13/DOR.REC. 9/21. 04. 048./2024-25 नुसार सर्व सहकारी बँकांना कर्ज घेणा-या सभासदांना कर्जाबाबतची विस्तृत माहिती देणेबाबत निर्देश देले आहेत.

भारतीय रिझर्व्ह बँकेमार्फत कर्ज करारनाम्यात आवश्यक बाबी अंतर्भूत करणे बाबतच्या निर्देशानुसार परिशिष्ट ''क्ष'' यास दिनांक २८.०५.२०२४ रोजीच्या संचालक मंडळाच्या सभेत मंजुरी घेण्यात आली आहे.

सर्व प्रकारच्या कर्ज प्रकरणांमध्ये सोबत जोडण्यात आलेल्या परिशिष्ट ''क्ष'' कर्ज करारनाम्यासोबत जोडण्यात यावा. सदर बदलाची अंमलबजावणी दिनांक ०१.०६.२०२४ पासून करण्यात यावी.

(To be printed on Green Legal size paper)
Annexure "X"
(Part of Agreement on categorization of SMA and NPA )

**Due Date of Repayment of Loan** 1st day of the month

**Eg.**

| | **Disbursement Date** | **Installment Start Date will be** |
|---|---|---|
| Loan Disbursed before 10th of month | 09-01-2024 | 01-02-2024 |
| Loan Disbursed on or after 10th of month | 20-01-2024 | 01-03-2024 |

**Frequency of Repayment** Monthly (Installment/ EMI)

**Breakup of Principal and Interest** Details are given in Repayment schedule

**SMA Categorisation**

Instructions on classification of borrower accounts into SMA categories are applicable for all loans. SMA Categorisation details are tabulated below

| **SMA Subcategories Basis** | **Basis for classification Principal or interest payment or any other amount wholly or partially overdue for** |
|---|---|
| SMA-0 | Up to 30 days |
| SMA-1 | More than 30 days and up to 60 days |
| SMA-2 | More than 60 days and up to 90 days |

**Non-performing Assets (NPA)**

A non-performing asset is a loan or an advance where:

(i) Interest and / or installment of principal remain overdue for a period of more than 90 days in respect of a Term Loan. Here, overdue means any amount due to the bank under any credit facility, if not paid by the due date fixed by the bank, becomes overdue.

(ii) Any amount to be received remains overdue for a period of more than 90 days in respect of other account

**Borrower's Signature** **Branch Manager's Signature**

## दि म्युनिसिपल को-ऑपरेटिव्ह बँक लिमिटेड, मुंबई
## मुंबई - ४०० ००१.

### विषय : फेअर लेंडींग प्रॅक्टिस-दंडात्मक शुल्क धोरण

बँकेचे फेअर लेन्डिंग प्रॅक्टिस धोरणाच्या मुद्दयांचा मराठीत अनुवाद खालीलप्रमाणे :

| अनु. क्र. | बँकेमार्फत प्रसारीत करण्यात येत असलेले फेयर लेन्डिंग प्रॅक्टिस धोरण |
|---|---|
| १. | कर्जाचा हप्ता/ई.एम.आय. देय दिनांकास म्हणजेच प्रत्येक महिन्याच्या एक तारखेस भरणा न केल्यास देय दिनांकाच्या पुढील दिनांकापासून थकीत झालेल्या रकमेवर (कर्जाचा हप्ता किंवा ई.एम.आय. प्रकार असल्यास देखील) १ द.सा.द.शे. प्रमाणे दंडनीय शुल्काची आकारणी संगणक प्रणालीद्वारे करण्यात येईल. |
| २. | कर्जाचा हप्ता/ई.एम.आय. देय दिनांकास भरणा न केल्याच्या कारणास्तव आकारण्यात आलेल्या दंडाची रक्कम कर्जाच्या मुद्दल रकमेत जमा/ एकत्रित करण्यात येणार नाही किंवा त्यानुसार कर्जाच्या व्याजदरात कोणताही बदल केला जाणार नाही. दंडाची रक्कम येणे (Receivable) खात्यात जमा करण्यात येईल. |
| ३. | ३. फेअर लेन्डिंग प्रॅक्टिसच्या धोरणाचा दोन आर्थिक वर्षांमध्ये कमीत कमी एकदा आढावा घेण्यात येईल. |
| ४. | आपली बँक ही पगारदार गटातील बँक असल्यामुळे बँकेमार्फत फक्त सभासदांनाच वैयक्तिक कर्ज वितरित करण्यात येते. बँकेमार्फत कर्ज प्रकरणांनुसार दंडात्मक शुल्कामध्ये तफावत करण्यात येणार नाही. |
| ५. | फेअर लेन्डिंग प्रॅक्टिसच्या धोरणाअंतर्गत संचालक मंडळाच्या मंजुरीने निश्चित होणारे दंडाचे शुल्क बँकेच्या संकेतस्थळावर तसेच सभासदाच्या कर्ज करारनाम्यामध्ये/ कर्ज अर्जामध्ये उल्लेख करण्यात येईल. |
| ६. | बँकेमार्फत सभासदास प्रत्येक महिन्याच्या २५ तारखेपर्यंत एस.एम.एस. द्वारे कर्ज हप्ता/ई.एम.आय. पुढील महिन्याच्या १ तारखेपर्यंत भरण्याकरीता तसेच दंडात्मक रकमेची माहिती देण्यात येईल. तसेच सभासदांकडून विहीत वेळेत कर्जाचा हप्ता किंवा ई.एम.आय. रकमेचा भरणा न केल्याच्या कारणास्तव वसूल करण्यात आलेल्या दंडात्मक शुल्काची रक्कम एस.एम.एस. द्वारे दंड रक्कम आकारल्यापासून कामकाजाच्या पुढील पाच दिवसात कळविण्यात येईल. |
| ७. | फेअर लेन्डिंग प्रॅक्टिसच्या धोरणाअंतर्गत मंजूर करण्यात आलेल्या दंडात्मक शुल्काची अंमलबजावणी नवीन कर्ज प्रकरणाकरीता दिनांक ०१.०४.२०२४ पासून नव्याने मंजूर किंवा कर्जाचे नुतनीकरण होणा-या सर्व कर्ज प्रकरणांकरीता लागू असून दिनांक ३१.०३.२०२४ पर्यंत किंवा त्याआधी पूर्ण किंवा अंशत: अधिदान झालेल्या कर्जांकरीता सदर बदल दिनांक ०१.१०.२०२४ पासून लागू होईल. |

| अनु. क्र. | बँकेमार्फत प्रसारीत करण्यात येत असलेले फेयर लेन्डिंग प्रॅक्टिस धोरण |
|---|---|
| ८. | मृत प्रकराच्या सभासदास दंडात्मक शुल्क आकारण्यात येऊ नये. |
| ९. | सभासदांमार्फत कर्ज खात्यात रक्कम जमा केल्यास मुद्दल रकमेच्या वसुलीपूर्वी सदर रक्कम वसूल करण्यात यावी. |

# दि म्युनिसिपल को-ऑपरेटिव्ह बँक लिमिटेड, मुंबई.
## मुंबई - ४०० ००१.

**कर्ज निरंक झाल्यानंतर सभासद/ग्राहकास त्याच्या कर्जाची मूळ कागदपत्रे (Original Movable/Immovable Property Documents) परत करणे आणि इतर संस्थेकडे चढविण्यात आलेला बोजा (चार्ज) उतरविणेबाबतची माहिती खालीलप्रमाणे :**

१) कर्ज निरंक झाल्यानंतर ३० दिवसांच्या आत शाखेमार्फत सभासद/ग्राहकास त्यांच्या कर्जाची मूळ कागदपत्रे (Original Movable/Immovable Property Documents) परत करण्यात यावीत आणि इतर संस्थांकडे चढविण्यात आलेला बोजा (चार्ज) देखील कर्ज पूर्णपणे निरंक झाल्यानंतर ३० दिवसांच्या कालावधीत उतरविण्यात येईल.

२) शाखेमार्फत मूळ कागदपत्रे (Original Movable/Immovable Property Documents) परत करताना बँकेच्या शाखेतून किंवा ज्याठिकाणी सदर कागदपत्रे जतन करुन ठेवली आहेत अशा बँकेच्या कार्यालयातून कर्जदाराच्या सोयीनुसार (अनु.क्र.१ नुसार) ३० दिवसांच्या आत नियमांचे पालन करुन परत करण्याचा पर्याय सभासद/ग्राहकास उपलब्ध असेल.

३) शाखेमार्फत सभासद/ग्राहकास कर्ज मंजूर केल्याबाबत देण्यात येणा-या पत्रावर (Sanction Letter) खाली नमूद करण्यात आलेल्या मजकूराचा शिक्का मारुन सदर शिक्क्यामध्ये संबंधीत शाखेच्या नावाचा उल्लेख करण्यात येईल.

'कर्ज निरंक केल्यानंतर ३० दिवसांच्या कालावधीत कर्जाची मूळ कागदपत्रे (Original Movable/Immovable Property Documents) ---------- शाखेतून घेण्यात यावी.'

"Please collect the Original Movable/Immovable Property Documents from ---------- Branch within a period of 30 days from the closure of loan account."

४) सभासद/ग्राहकाचा मृत्यू होणे किंवा न्यायालयात दावा दाखल केलेल्या प्रकरणात :

**(अ) कर्ज निरंक असून कर्ज मंजूर करण्यात आलेल्या सभासद/ग्राहकाचा मृत्यू झाला असल्यास :**

- मूळ कागदपत्रे (Original Movable/Immovable Property Documents) व इतर संस्थेकडे चढविण्यात आलेला बोजा (चार्ज) उतरविण्याबाबतचा विनंती अर्ज देण्यात यावा.
- मृत्यूचा दाखला मूळ प्रतीसोबत तपासून शाखा व्यवस्थापकांमार्फत Verified with Original शिक्का व सही करण्यात येईल.
- कायदेशीर वारसाबाबत न्यायालयाचे सर्टिफिकेट किंवा कुटुंबामधील इतर सदस्यांचे ना हरकत प्रमाणपत्र रु.१००/- च्या बाँडपेपरवर घेण्यात येऊन सोबत आधारकार्ड आणि पॅनकार्ड किंवा स्वाक्षरी व्हेरीफिकेशनचा दाखला जोडण्यात यावा.

- अनु.क्र.३ नुसार कुटुंबामधील इतर सदस्यांमार्फत अनुमती देण्यात आलेल्या व्यक्तीमार्फत रु.२००/- च्या बाँड पेपरवर मूळ कागदपत्रे (Original Movable/Immovable Property Documents) व इतर संस्थेकडे चढविण्यात आलेला बोजा/चार्ज उतरविण्यासाठी त्याच्या व्यतिरिक्त दुसरा कोणीही कायदेशीर वारस नसल्याबाबतचे प्रतिज्ञापत्र घेण्यात यावे. सदर प्रतिज्ञापत्र Notary Before Me करण्यात यावे.

**(ब) कर्ज निरंक असून कर्ज मंजूर करण्यात आलेल्या सभासद/ग्राहकाचा मृत्यू झाला असल्यास मात्र मूळ कागदपत्रे जाँईट नावावर असल्यास :**

- कर्ज मंजूर करण्यात आलेल्या सभासद/ग्राहकाचा मृत्यूचा दाखला घेऊन एकत्रित नाव असलेल्या हयात व्यक्तीस मूळ कागदपत्रे Original Movable/Immovable Property Documents) परत करण्यात येईल व इतर संस्थेकडे चढविण्यात आलेला बोजा/चार्ज उतरविण्यात येईल.

**(क) कर्ज निरंक असून कर्ज मंजूर करण्यात आलेल्या सभासद/ग्राहकाचा तसेच मूळ कागदपत्रे जाँईंट नावावर असलेल्या सर्वाचा मृत्यू झाला असल्यास :**

- वरील 'अ' प्रमाणे कार्यवाही करण्यात येईल.

**(ड) कर्ज निरंक असून कर्ज मंजूर करण्यात आलेल्या कोणाही एकाचा किंवा एकापेक्षा जास्त व्यक्तींचा सभासद/ग्राहकाचा मृत्यू झाला असल्यास मात्र मूळ कागदपत्रे जाँईट नावावर असलेल्यांपैकी मृत्यू झाला असल्यास :**

- कर्ज मंजूर करण्यात आलेल्या सभासद/ग्राहकाचा आणि जाँईंट नावावर असलेल्यांपैकी मृत्यू झालेल्या व्यक्तीचा दाखला घेऊन तसेच जाँईंट नावांपैकी हयात व्यक्ती/व्यक्तीस मूळ कागदपत्रे (Original Movable/Immovable Property Documents) परत करण्यात येतील व इतर संस्थेकडे चढविण्यात आलेला बोजा/चार्ज उतरविण्यात येईल.

**(फ) कायदेशीर वाद असल्यास :**

- कायदेशीर वारसाबाबत न्यायालयीन निकालाची प्रत घेऊन सदर निकालानुसार कायदेशीर वारसास मूळ कागदपत्रे (Original Movable/Immovable Property Documents) परत करण्यात यावी व इतर संस्थेकडे चढविण्यात आलेला बोजा/चार्ज उतरविण्यात येतील.

५) कर्जदार सभासद/ग्राहकास कर्ज निरंक केल्यानंतर उतरविण्यास मूळ कागदपत्रे परत करण्यास तसेच इतर संस्थांकडे चढविण्यात आलेला बोजा (चार्ज) उतरविण्यास ३० दिवसांपेक्षा जास्त विलंब झाल्यास सदर विलंबाचे कारण शाखेमार्फत संबंधीतास लिखित स्वरुपात कळविणे बंधनकारक आहे. तसेच ३० दिवसांनंतर जेवढे दिवस विलंब होईल त्या प्रत्येक दिवशी रु.५,०००/- भरपाई कर्जदार सभासद/ग्राहकास देणे बंधनकारक राहिल.

..३..

६) बँकेकडून मूळ कागदपत्रे पूर्णपणे किंवा अंशत: हरविल्यास, गहाळ झाल्यास, खराब झाल्याच्या कारणास्तव सभासद/ग्राहकास परत करण्यास असमर्थ ठरल्यास सदर कर्जदार सभासद/ग्राहकास मूळ कागदपत्रांच्या साक्षांकित प्रती (Certified Copy) काढण्यास बँक मदत करील व त्यासाठी होणारा खर्च बँकेस करावा लागेल. तसेच त्याबाबतीत ३० दिवसांऐवजी ६० दिवसांनंतर होणा-या विलंबास प्रतिदिन रु.५,०००/- प्रमाणे कर्जदार सभासद/ग्राहकास रक्कम अदा करणे बंधनकारक राहिल.

७) प्रतिदिन रु.५,०००/- प्रमाणे येणा-या रक्कमेशिवाय सदर प्रकरणात लागू होणा-या इतर कायद्यांच्या तरतूदीअंतर्गत निश्चित करण्यात आलेली नुकसान भरपाईदेखील देणे बँकेवर बंधनकारक असेल.

८) उपरोक्त नमूद केलेले नियम (Original Movable/Immovable Property Documents घेण्यात आले आहेत. तसेच इतर संस्थांकडे बोजा/चार्ज चढविण्यात आला आहे.) अशा सर्व प्रकारच्या कर्जासाठी लागू आहे.

सदर नियम दिनांक ०१.१२.२०२३ पासून निरंक होणा-या सर्व कर्ज प्रकरणांच्या बाबतीत लागू होईल.

rmb/- 30.07.2024
SM-Loans